जा.क्र.मराप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१७/ 4614
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक - 05/08/२०१७

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य,
सर्व शासनमान्य वाणिज्य टंकलेखन संस्था
महाराष्ट्र राज्य व गोवा.

विषय :- संगणक टायपिंग अभ्यासक्रम सत्र जुलै २०१७ ते डिसेंबर २०१७साठी प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन करणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मराप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१७/३७५५ दि.२७/०६/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी राज्यातील ज्या शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्थांना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या मार्फत मान्यता मिळालेली आहे आणि महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून ई-प्रमाणपत्र (संगणक टायपिंग सांकेतांक क्रमांक) प्राप्त झाले आहे. अशा संस्थामधून जुलै २०१७ ते डिसेंबर २०१७ या सत्रासाठी प्रवेशित झालेल्या उमेदवारांची मराठी, हिंदी, इंग्रजी ३० आणि ४० श.प्र.मि या विषयांसाठी परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी दिनांक ७ ऑगस्ट २०१७ ते २१ ऑगस्ट २०१७ या कालावधीत लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या कालावधीत परिषदेच्या संकेतस्थळावर प्रवेशित विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरावी. संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संस्थेच्या जनरल रजिस्टरप्रमाणे नोंदविणे आवश्यक आहे. संगणक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र जनरल रजिस्टर ठेवण्यात यावे.

ई-प्रमाणपत्र प्राप्त संस्थांनाच या सत्रासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल आणि प्रवेशित विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करता येईल. विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाईल. संकेतस्थळावर संस्थांनी नोंदणी केलेल्याच विद्यार्थ्यांचीच ऑनलाईन आवेदनपत्र भरता येतील याची नोंद घ्यावी.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१

प्रत माहितीस्तव:-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प. (सर्व)
३. शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम)